'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Vol. 3, Issue-4
ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

# मराठीचा उगमकाल, जनकभाषा आणि अभिजातता : एक अभ्यास

**डॉ. प्रमोद गंगाधर आंबेकर**
**कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,**
**मनमाड ता. नांदगाव जि. नाशिक**
**मो. ९९२२७१३८२५**

सर विल्यम जोन्स यांच्या जगप्रसिद्ध विधानानुसार कोणत्याही भाषेचे विविध कालखंडातील ध्वनी परिवर्तन कसे होत गेले, ते ऐतिहासिक पुराव्यांआधारे शोधून त्यातील ध्वनी परिवर्तनाचे नियम शोधून काढता येतात. या नियमानुसार मूलस्थानी असलेल्या परंतु आज लुप्त झालेल्या भाषेचा अंदाज करतो येतो. ही त्या भाषेची पूर्वावस्था असते, तेथून तिच्या उत्तरोत्तर अवस्थांचा अभ्यास ऐतिहासिक भाषाविज्ञानात केला जातो. या अभ्यास पद्धतीनुसार जगातील भाषांचे वेगवेगळ्या शाखांमध्ये वांशिक वर्गीकरण केले जाते. त्यांना भाषाकुल असे म्हणतात.

जगातील काही प्रमुख भाषाकुले पुढीलप्रमाणे आहेत- १) इंडो-युरोपियन भाषाकुल २) हेमिटो-सेमिटिक भाषाकुल ३) सिनो-तिबेटिअन भाषाकुल ४) द्राविडी भाषाकुल ५) ऑस्ट्रो-एशियानी भाषाकुल ६) फिनो-उग्रिक भाषाकुल ७) अल्ताईक भाषाकुल ८) कॉकेशस भाषाकुल ९) मलायो-पॉलिनिशियन भाषाकुल १०) जपानी भाषाकुल ११) अमेरिकेतील मूळ भाषा १२) ऑस्ट्रेलियातील भाषा १३) आफ्रिकेतील भाषा १४) सुमेरिअन व इट्रस्कन या प्राचीन भाषा १५) बास्क भाषा (उत्तर स्पेन) १६) बरुशस्की भाषा (भारताच्या वायव्येला बोलली जाते) १७) पॉप्युअन भाषा (न्यू-गिनी) १८) पॉलिओ- ऍशियाटिक अथवा हायपर-बोलियन गटातील भाषा, इत्यादी.

भारतात प्रामुख्याने पुढील चार भाषाकुलातील भाषा बोलल्या जातात. १) इंडो-युरोपियन भाषाकुल- मराठी, गुजराती, बंगाली, हिंदी इत्यादी २) द्राविडी भाषाकुल-तमीळ, तेलुगू, मल्याळम् आणि कानडी या प्रमुख भाषा ३) ऑस्ट्रो-एशियाची भाषाकुल- मुंडा शाखेतील बिहार प्रांतात बोलली जाणारी भुंडारी भाषा, बिहार व पश्चिम बंगालमधील सन्ताळी भाषा, मेघालयातील खासी भाषा इत्यादी ४) सिनो-तिबेटिअन भाषाकुल- तिबेटी-ब्रह्मी शाखेतील लडाखी, नेवारी, बोरो, मणिपुरी व मिझो भाषा.

इंडो-युरोपियन भाषाकुलाला इंडो-जरमॅनिक अथवा आर्य भाषाकुल असेही म्हटले जाते. या भाषाकुलाचा विस्तार साधारणत: पूर्वेकडील भारतापासून पश्चिमेकडील आईसलंड या देशापर्यंत आहे. भारतीय भाषांचा समावेश या भाषाकुलाच्या इंडो-इटालियन शाखेत केला जातो. त्यांना आर्यभारतीय भाषा (इंडो-आर्यन) म्हटले जाते. या उपशाखेतील संस्कृत ही प्रमुख भाषा असून तिच्यापासून प्राकृत-अपभ्रंश-मराठी, गुजराती, हिंदी, बंगाली असा विकासक्रम दाखविला जातो. थोडक्यात मराठी ही आर्यभारतीय भाषाकुलातील एक महत्त्वाची भाषा असून संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश-मराठी असा मराठीचा उगम दाखविला जातो. मात्र अलीकडील संशोधनाने मराठी भाषेचा उगमकाल २५०० वर्षे मागे नेवून तिची अभिजातता सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

कोणतीही भाषा एकाएकी उद्‌भवत नाही आज प्रचलित भाषेला अनेक शतकांचा इतिहास लाभलेला असतो. भाषेच्या जन्माची प्रक्रिया प्रदीर्घ काळ चालू असते. कालौघात भाषांमध्ये बदल होत असतो. कधी भाषेतील शब्दांचे औच्चारिक स्वरुप बदलते, कधी अर्थ बदलतो, शब्दसंग्रहात हळूहळू बदल होत असतो.

काही शब्द वापरातून नाहीसे होतात तर काही वेळा अन्य भाषांशी संबंध आल्यामुळे नवे शब्द भाषेत स्वीकारले जातात, तर काही शब्द गरजेनुसार नव्याने घडविले जातात. विविध कारणांमुळे हे भाषिक परिवर्तन होत असते, मात्र भाषेच्या उत्तरकालीन अवस्थेत पूर्व भाषेची अनेक वैशिष्ट्ये कायम राहतात. त्यांच्यात ध्वनी, व्याकरण आणि शब्दसंग्रह या सर्व पातळ्यांवर साधर्म्य आढळते. त्यामुळे भाषांच्या उगमकाल व जनकभाषा यासंबंधीची अनेक मत-मतांतरे संभवतात. मराठीच्या उगमकालासंबंधी अशाच प्रकारे विविध मत-मतांतरे मांडली जातात, ती पुढीलप्रमाणे-

**१. वैद्य-गुणे वाद :-** ( विविध ज्ञानविस्तार- वर्ष ५३, अंक- ५,७,८ इ.स. १९२२)

चि. वि. वैद्य यांच्या मते 'मराठी भाषेची निर्मिती इसवी सनाच्या ८ व्या शकतात झाली. शंकराचार्यांनी वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन केले ही घटना मराठीच्या निर्मितीस कारणीभूत ठरली.' परंतु धार्मिक वा वैचारिक क्रांतीमुळे भाषा उत्पन्न झाली या मतावर आक्षेप नोंदविण्यात आले.

वैद्य यांची मते डॉ. पा. दा. गुणे यांनी बाद ठरविली. यातून वैद्य-गुणे वाद उद्‌भवला. गुणे यांनी केलेली मीमांसा- 'दहाव्या शतकाच्या अखेरी तार्तारांनी उत्तर हिंदुस्थानवर आक्रमण केल्यामुळे उत्तर हिंदुस्थानात आधी वस्ती करुन राहिलेले गुर्जर, परमार, चालुक्य, इ. अन्य धर्मीय व अन्य भाषिक समाज स्थलांतर करुन दक्षिणेकडील व पूर्वेकडील हिंदू लोकांत मिसळले. यातून नव्या भाषा उत्पन्न होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. पुढे अकराव्या शतकापासून अफगाण, अरब, तार्तार इ. भिन्न भाषिक लोक हिंदुस्थानात येऊन आमच्या भाषा बोलू लागल्यामुळे आधुनिक आर्यभारतीय भाषा निर्माण झाल्या.'

**२. मराठी व वैदिक संस्कृत-नाते :-**

वि. का. राजवाडे यांच्यासारख्या काही विद्वानांच्या मते वैदिक संस्कृतपासून मराठी भाषा उत्पन्न झाली आहे. ऋग्वेद कालीन वैदिक संस्कृत आणि आजच्या मराठीत साम्य असल्याचा दाखला दिला जातो व त्या आधारे मराठीचे अतिप्राचीनत्व सांगितले जाते. डॉ. म. अ. करंदीकर यांनी वैदिक संस्कृत व मराठीतील शब्द यांचे साम्य दाखविले पण साक्षात वैदिक संस्कृतपासून मराठी उगम पावली हे मत अमान्य केले.

**३. प्राकृत भाषा व मराठी :**

डॉ. भांडारकर व झूल ब्लोक यांनी मराठीचा जन्म प्राकृतपासून झाल्याचे नोंदविले आहे. परंतु त्यांच्या काळात अपभ्रंश भाषेचे वाङ्मय उपलब्ध झाले नव्हते. त्यामुळे त्यांच्या संशोधनावर मर्यादा पडतात. त्याचबरोबर प्राकृत भाषा व नव्याने निर्माण झालेल्या भाषा यामध्ये मोठे कालिक अंतर असल्याने साक्षात प्राकृत पासून या भाषा निर्माण झालेल्या नाहीत असे प्रतिपादन 'बीम्स्' या अभ्यासकाने केले आहे. होर्न्ले यांनीही मराठी आणि महाराष्ट्री यांच्यातील जन्य-जनक संबंध अमान्य केला आहे. त्यांच्यामते महाराष्ट्र म्हणजे मोठे राष्ट्र होय. विशिष्ट भाषिक प्रदेश नव्हे, स्टेन कौनो यांनी मात्र ध्वनिविचार व रुपविचार ही व्याकरणाची दोन अंगे विचारात घेऊन मराठी आणि महाराष्ट्री यांचा जन्य-जनक संबंध दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ. म. अ. करंदीकर यांनी महाराष्ट्रीपासूनच मराठी जन्माला आली असून महाराष्ट्री अपभ्रंशापासून नाही, असे मत मांडले आहे. राजवाडे, ग्रिअर्सन व गुणे इत्यादी विद्वान मराठीची उत्पत्ती महाराष्ट्री अपभ्रंशापासून लावतात. या बाबतीत समजूतदार व व्यापक दृष्टीकोन स्वीकारुन कृ. पा. कुलकर्णी म्हणतात- ''मराठी भाषा अमुक एका प्राकृतापासून उत्पन्न झालेली नसून सर्व प्राकृत भाषा, अपभ्रंश व संस्कृत यांनी आपापल्या परीने मराठीच्या जन्मास हातभार लावलेला दिसतो.''

४. अपभ्रंश भाषा व मराठी :-

भाषेचा जन्य-जनक संबंध शोधत असताना वर्णप्रक्रिया आणि प्रत्यय प्रक्रिया विचारात घ्याव्या लागतात. महाराष्ट्री प्राकृत व मराठी यांच्यात वर्णप्रक्रिया व प्रत्ययप्रक्रिया यांबाबतीत साम्य कमी आहे. म्हणून डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी अपभ्रंश भाषेला मराठीची जननी ठरविले आहे. त्यांच्या मते, 'यादवकालीन मराठीचे प्राकृताशी फार साम्य नसून तिचे अपभ्रंशाशी निकट नाते आहे.' त्यांनी महाराष्ट्री प्राकृत व यादवकालीन मराठी यांच्यामधला 'अपभ्रंश' हा दुवा सप्रमाण दाखवून दिला आहे. ते म्हणतात- 'अपभ्रंशाच्या जीर्ण व काहीशा बेडौल पायावर मराठीने स्वत:चे बांधकाम केले. ते करताना तिला नवीन मालमसाला बराच वापरावा लागला व तो अवश्य तेथे वापरुन तिने आपल्या बांधकामात जुन्या-नव्यांचा सांधा अपूर्वाईने जोडला. या दृष्टीने यादव-मराठीने भाषेची निरनिराळी अंगे त्यात वैशिष्ट्यांची भर घालून पोसली व स्वत:ची अस्मिता सिद्ध केली.' गं.बा. ग्रामोपाध्ये यांच्या मते, 'अपभ्रंशापासून आधुनिक मराठी परिणत होत असताना तिचे संस्कृतीकरणही घडून आले.' या संदर्भात ते म्हणतात, ''भाषा विकासाच्या अवस्थेत मराठी अधिकाधिक सोपी होण्याच्या एकीकडून प्रयत्न करत असतानाच, दुसरीकडून मध्यंतरी लोप पावलेल्या संस्कृत उच्चारांचा, संस्कृत रुपांचा व तत्सम शब्दांचा वापर करण्याचा प्रयत्न ती करु लागली.''

**५. द्राविडी भाषा आणि मराठी :-**

वि. रा. शिंदे, शं. बा. जोशी व विश्वनाथ खैरे यांनी मराठीचा उगम द्राविडी भाषांपासून झाल्याचे प्रतिपादन केले आहे. शं. बा. जोशी मराठीचा जन्म कानडी भाषेपासून झाल्याचे प्रतिपादितात, तर विश्वनाथ खैरे मराठीचा जन्म कानडीपूर्व तामिळी भाषेपासून झाल्याचे आत्यंतिक आग्रही मत मांडतात. शं. बा. जोशींनी कर्नाटक व महाराष्ट्र या प्रांतांचे सांस्कृतिक संबंध पुरातन असल्याचे दाखविले आहे. त्यांच्या मते, 'आर्यपूर्व भारतातील 'हट्ट' नावाच्या लोकसमूहाने नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत एक संस्कृती नांदवली होती. आजचे मराठी व कानडी लोक यांचे पूर्वजीवन अभिन्नत्वाने या संस्कृतीत परिपुष्ट झाले होते. कालांतराने आर्यांनी दक्षिणापथात प्रवेश केल्यामुळे हट्टजनांच्या संस्कृतीचे आर्यीकरण सुरु झाले व हळूहळू मराठी व कानडी लोक यांची भाषा, दैवते, आचार व स्वभाव यात अंतर पडू लागले. यादव काळापर्यंत हे द्वैत पूर्ण झाले व सहोदर अशा मराठी-कानडी संस्कृतीमध्ये वेगळेपणाची स्पर्धा व तेढ उत्पन्न होऊ लागली. महाराष्ट्र या शब्दाची व्युत्पत्ती ही श्री. जोशी 'कानडी 'मर' = झाडी + 'हट्ट' = मंडळ = मरहट्ट-मऱ्हाट याचे सांस्कृतिकरण होऊन महाराष्ट्र शब्द रुढ झाला', अशी लावतात. म्हणजेच, महाराष्ट्र = हटगार लोक जेथे राहतात तो झाडीयुक्त प्रदेश. मात्र हे प्रतिपादन अमान्य करण्यात आले. यादवपूर्व काळात मराठीचा उगम झाल्याचेही त्यांचे प्रतिपादन आहे. कानडीपासून मराठी जन्माला आली असा हा सिद्धांत वादग्रस्त ठरला. त्याचबरोबर वि. रा. शिंदे यांनी काही शब्दांच्या आधारे मराठीचा अनुबंध कानडीत संशोधिला आहे.

विश्वनाथ खैरे यांनी 'मराठी भाषेचे मूळ' या ग्रंथात मराठी भाषेचा उगम तामिळ भाषेपासून झाल्याचे दर्शविले आहे. महाराष्ट्र प्रदेशात प्रागैतिहासिक काळात तामिळ (सदृश) भाषा प्रचलित असावी असा मर्यादित विचार मांडला आहे.

**६. मराठी भाषेची अभिजातता :-**

मराठी भाषेच्या जन्य-जनक भाषेसंदर्भातील विविध मत-मतांतरांचा अभ्यास करुन, तसेच नवीन उपलब्ध झालेल्या पुराव्यांचा अभ्यास करुन मा. श्री. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मराठी भाषेची अभिजातता सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानुसार ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर,

राजारामशास्त्री भागवत, दुर्गा भागवत, वा. वा. मिराशी, डॉ. कृ. पां. कुलकर्णी, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. शं. गो. तुळपुळे, ल. रा. पांगारकर, डॉ. ह. धि. सांकलिया आणि इतर अनेक मान्यवरांच्या ग्रंथांचे पुरावे पाहता मराठी भाषेचे वय सुमारे २५०० वर्षे असल्याचे सिद्ध होते. मराठी ही सांस्कृतोद्‌भव भाषा आहे आणि तिचे वय १००० वर्षापेक्षा कमी आहे अशी लोकसमजूत करुन देण्यात आली आहे. मात्र अलीकडील अभ्यासानुसार मराठी भाषेच्या विकासाचे पुढील टप्पे दिसून येतात–

१. प्राचीन महारट्टी भाषा
२. मरहट्टी भाषा
३. महाराष्ट्री प्राकृत भाषा
४. अपभ्रंश मराठी भाषा
५. मराठी भाषा (यादवकाल, बहामणी–शिवकाल–पेशवेकाल, आंग्लकाल– १९ वे शतक, आधुनिक मराठी)

मराठी ही मुख्यत: महाराष्ट्राची भाषा असून वेदपूर्व काळापासून चालत आलेल्या लोकभाषांमधून ती तयार झाली आहे. अशाच एका दुसऱ्या लोकभाषेतून संस्कृत जन्माला आलेली आहे. आजपर्यंत मराठीवर १) आर्यांची बोलभाषा २) वैदिक ३) संस्कृत ४) विविध प्राकृत तसेच ५) द्रविडीभाषा यांचा परिणाम झाला आहे. मराठीत तत्सम, तद्‌भव व देश्य या तीनही प्रकारचे शब्द आढळतात. महाराष्ट्री म्हणून जी प्राकृत भाषेतील विशेष प्रौढ व वाङ्‌मयीन भाषा तीच मराठी होय.

मराठी भाषेतील पहिला शिलालेख २२२० वर्षापूर्वीचा असून तो ब्रह्मी लिपीतील आहे. तो पुणे जिल्ह्यातील जुन्नर जवळच्या नाणेघाटातील आहे. या शिलालेखात महारठिनो लोकांचा स्पष्ट उल्लेख आहे. डॉ. वा. वि. मिराशी यांनी आपल्या 'सातवाहन आणि पश्चिमी क्षेत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख' या ग्रंथात हा शिलालेख प्रसिद्ध केला आहे. ("...य महरठिनोअंगियकुलवधनस सगरगिरिवलयाय पथविय पथमवीरस वस... य महतो मह...." अनुवाद. ". ... महाराठी अंगिय कुलोत्पन्न गिरीसमुद्रवलयांकित पृथ्वीवरील वीरश्रेष्ठ... महान अशा पुरुषात श्रेष्ठ अशा....") ज्या मराठी भाषेत हा शिलालेख लिहीला गेला आहे ती त्याआधी किमान २०० ते ३०० वर्षे अस्तित्वात असली पाहिजे. रामायण, महाभारतातही शेकडो मराठी शब्द सापडतात. २ हजार वर्षांपूर्वी बृहत्कथा हा पैशाची भाषेतील ग्रंथ 'गुणाढ्य' या मराठी लेखकाने लिहिला आहे.

२००० वर्षापूर्वीचा महाराष्ट्र नामाचा उल्लेख :– 'विनयपिटक', 'दीपवंश', 'महावंश' या बौद्ध ग्रंथांमध्ये पाली व सिंहली भाषेत महाराष्ट्राचा उल्लेख आलेला आहे. मोगलिपुत्तातिष्य याने काही 'थेर' म्हणजे श्रेष्ठ धर्मोपदेशक निरनिराळ्या देशांना पाठविल्याचा उल्लेख आहे. यापैकी 'महारट्ठ' देशात 'थेरोमहाधम्मरखिता' यास पाठविले असे म्हटले आहे.

'रक्खितथेरं वनवासि योनक धम्मरक्खित थेरं अपरंकतं महाधम्मरक्खित थेरं महारट्ठ.' 'महारट्टी–मरहट्टी–मऱ्हाटी–मराठी' असा उच्चारभ्रमाचा प्रवास झालेला दिसतो. महारट्टीचे महाराष्ट्री हे नामकरण संस्कृत भाषेने, तिच्यातल्या पंडितांनी केले. संस्कृत भाषेला 'संस्कृत' हे नाव मिळण्याआधी 'महाराष्ट्री भाषा' अस्तित्वात होती, एवढेच नाही, तर ती प्रगल्भ झालेली होती. अश्मक, कुंतल, अपरान्त, विदर्भ या प्रदेशांत प्राकृत महाराष्ट्री प्रचारात होती. इतकेच नाहीतर सातवाहनांच्या राजवटीत (इ.स. पूर्व २ रे शतक ते इ.स. २ रे शतक) त्यांचा साम्राज्य विस्तार कुरुक्षेत्र, पेशावर इथपर्यंत झाल्यामुळे ती भारताच्या बऱ्याच मोठ्या भूभागात प्रचलित होती. म्हणूनच 'गाहासत्तसई' उर्फ 'गाथासप्तशती' या हाल सातवाहन राजाने संकलित केलेल्या गाथांच्या प्रतींची हस्तलिखिते देशभर अनेक ठिकाणी सापडलेली आहेत.

'गाथासप्तशती' हा मराठीतला आज उपलब्ध असलेला पहिला ग्रंथ सुमारे २००० वर्षे जुना असून तो नि:संशय महाराष्ट्रात लिहिला गेला आहे. सातवाहन राजाने अनेक ठिकाणांहून गाथा जमवून त्यांचा संग्रह केला. यामुळे लोकांचा आनंद संकोच पावला नाही उलट विस्तार पावला. गाथासप्तशतीतील भौगोलिक स्थाने, नद्या सारे महाराष्ट्र देशातीलच आहे. गिरणा, गोदावरी, तापी, नर्मदा, मुळा या नद्या या ग्रंथात प्रामुख्याने आहे. बहुसंख्य उल्लेख त्र्यंबकेश्वरी, गोदावरी, पैठण यांचे आहेत. गाथासप्तशती हे महाराष्ट्राचे आद्य लोकसाहित्य आहे. त्यात काव्यगत कृत्रिमता अजिबात नाही. जीवनाची करुण, दारुण व हृदयस्पर्शी अशी सर्वअंगे सारख्याच कुशलतेने तिच्यात रेखाटलेली आहेत.

महाराष्ट्री प्राकृत ही भारतातील सर्व प्राकृत भाषांमध्ये सर्वाधिक महत्त्वाची मानली जात होती. पाणिनीच्या समकालीन 'वररुची (कात्यायन)' याने प्रामुख्याने तिचेच व्याकरण रचले आहे. त्याने लिहिलेला 'प्राकृत प्रकाश' हा व्याकरण ग्रंथ ख्यातनाम आहे. त्याकाळी लेखक कोणत्याही प्रदेशातला असला तरी ललित लेखनासाठी महाराष्ट्री प्राकृतचाच स्वीकार केला जात असे. साहजिकच प्राकृताची क्षेत्रमर्यादा केवळ महाराष्ट्र ही नव्हती तर त्याहून व्यापक प्रदेशात तिचा संचार होता. 'भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थे'कडे सुमारे ३० हजार प्राचीन पोथ्या उपलब्ध असून त्यातील दीड ते दोन हजार वर्ष जुन्या असलेल्या सुमारे ८० ग्रंथांमध्ये मराठी भाषा, त्यात प्रामुख्याने कालिदासाचे 'शाकुंतल' (४ थे शतक), शुद्रकाचे 'मृच्छकटीक' (६ वे शतक), प्रवरसेनाचे 'सेतुबंध' (५ वे शतक), भद्रबाहुचे 'आवश्यक नियुक्ती' (३ रे शतक), विमलसुरीचे 'पौमचरिया' (१ ले ते ३ रे शतक) यांचा समावेश आहे.

प्राचीन महाराष्ट्रातील साहित्यसृष्टीकडे नजर टाकल्यास एका मोठ्या परंपरेचे दर्शन घडते. मराठी भाषेत उत्तम प्रतीचे वाङमय तेराव्या शतकात निर्माण झाले, पण त्यापूर्वी या भूभागात राहणाऱ्या अनेकांनी संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश भाषांत वाङ्मय निर्मिती केली. याचे उत्तम उदाहरण म्हणजे कविकुलगुरु कालिदास होय. त्याने मेघदूताची निर्मिती रामगिरी येथे केली. मृच्छकटिकाचा कर्ता शुद्रक हा महाराष्ट्रीय होता. 'दशकुमारचरित' कर्ता दंडी हाही मूळचा महाराष्ट्रीय मानला जातो. प्रसिद्ध ज्योतिषी व गणिती भास्कराचार्य हाही महाराष्ट्रीय होता. याचा अर्थ असा की, प्रत्यक्ष मराठी भाषेत प्रौढ स्वरुपाची ग्रंथरचना सुरु होण्यापूर्वी महाराष्ट्रातील पूर्वकवींनी मोठ्या प्रमाणात ग्रंथनिर्मिती करुन लौकिक मिळविला होता. पूर्वसुरींच्या या ग्रंथाचा काही एक परिणाम यादवकालीन मराठी लेखकांवर निश्चीतपणे झाला असला पाहिजे. महानुभाव व वारकरी पंथातील कवींनी गाठलेल्या वाङ्मयीन उंचीला त्याआधीची चार-पाचशे वर्षांची परंपरा कारणीभूत ठरली. ल. रा. पांगारकर यांनी सोदाहरण दाखवून दिले आहे की, महाराष्ट्री प्राकृत, महाराष्ट्री अपभ्रंश, आजची मराठी या वेगवेगळ्या भाषा नसून ती एकाच भाषेची तीन रुपे आहेत. लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, विवेकसिंधू हे मराठीतले आद्यग्रंथ नाहीत, तर ते मराठी प्रगल्भ व श्रीमंत झाल्यानंतरचे श्रेष्ठ ग्रंथ आहेत. हे जागतिक तोडीचे ग्रंथ आठशे वर्षापूर्वी ज्या भाषेत लिहिल्या गेले. ती त्याच्या आधी बारा-पंधराशे वर्षे अत्यंत समृद्ध भाषा होती. याचे शिलालेख, ताम्रपट, पोथ्या आणि हस्तलिखित ग्रांथिक पुरावे आज उपलब्ध झाले आहेत.

हाल सातवाहनाची 'सत्तसई' जयवल्लभाचा 'वज्जालग्ग' हा सुभाषित कोश, प्रवरसेन वाकाटकाचे 'रावणवहो' वाक्पतीराजाचे 'गरुडवहो' ही महाकाव्ये हे महाराष्ट्री प्राकृतातील प्रमुख ग्रंथ आहेत. ''महाराष्ट्राश्रया भाषां प्रकृष्ट प्राकृतं विदु:।'' असे महाकवी दंडी म्हणतो. म्हणूनच महाराष्ट्री प्राकृत हा महाराष्ट्रीयाचा अभिमानविषय आहे. मूलत: ही भाषा महाराष्ट्राचीच, हे नि:संशय. शिवाय प्रचलित मराठीशी महाराष्ट्रीचे निकटचे नाते व साम्य आहे हे अनेक उदाहरणांवरुन व व्युत्पत्यांवरुन सिद्ध होते. 'संस्कृतवाणी देवे केली मग प्राकृत

ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

काय चोरापासून झाली?' असा संतप्त सवाल एकनाथांनी विचारला होता. एकनाथांची भाषा मराठी असूनही ते तिला प्राकृत म्हणतात. यावरुन या दोन वेगळ्या भाषा नाहीत हेच स्पष्ट होते. ज्ञानेश्वरांनी मराठीला देशी भाषा म्हटलेले आहे. हेमचंद्राचे 'देशीनाममाला' हे या भाषेचे व्याकरण प्रसिद्ध आहे.

ज्ञानेश्वरीत मराठी भाषेला 'मऱ्हाठी' या शब्दाबरोबरच 'देशी' हा शब्दही वापरलेला आहे. किंबहुना मराठीचे 'देशी' हेच नाव अधिक रुढ होते. अपभ्रंश ग्रंथांतून त्यातील भाषेलाच म्हटलेले आहे. अपभ्रंश भाषेचे साहित्यांतर्गत नाव 'देसी' असेच आहे. अपभ्रंश नव्हे या 'देसी'चा विकास होऊन जी भाषा निर्माण झाली ती 'देशी' किंवा मराठी ती अपभ्रंशाच्या 'नागर' या प्रकारातून निघाली. अपभ्रंशापासून मराठी निघाली हे डॉ. वि. भि. कोलते यांनी वाङ्मयीन पुराव्याने सिद्ध केले आहे.

'देशी' याचा अर्थ त्या त्या भूमीशी जोडलेले असणे असा होतो. ज्ञानेश्वर सुद्धा 'दाऊ वेल्हळ देशी नवी' असे आक्रमक होतात आणि भटोबाससारख्या गाढ्या पंडितालाही 'तुमचा अस्मात कस्मात मी नेणे गा: मज श्री चक्रधरे निरुपिली मऱ्हाटी: तियाची पुसा' असे म्हणावे लागते.

इ. स. ७७८ मध्ये लिहिलेल्या उद्योतनसुरी याच्या 'कुवलयमाला' या ग्रंथात अठरा देशी भाषांचा उल्लेख आहे. अठरा देशी भाषांपैकी एकीचे नाव 'मरहट्ट' असे आहे. मरहट्टांचे भाषेचे वर्णन येणे प्रमाणे–

'दढमडह सामलंगे सहिरे अहिमाण कलहसले य ।
दिण्णले गहिल्ले उल्लविरे तत्थ मरहट्टे ।।'

(अर्थ– घटमुट, काळासावळा, सहनशील, अभिमानी, कलहशील व दिण्णले गहिल्ले बोलणारा मरहट्टा...)

'गाथा सप्तशती' ग्रंथातील गाथांमधील समाज जीवन आणि सामाजिक पर्यावरण मराठी असल्याचे दिसते. महाराष्ट्राचा प्रचीनतम उल्लेख अप्रत्यक्षपणे वररुचीच्या प्राकृत व्याकरणात मिळतो. त्याने 'महाराष्ट्री' हे त्या प्रदेशातील प्राकृत भाषेचे नाव दिले आहे. त्यात त्याने शौरसेनी, मागधी, पैशाची, महाराष्ट्रीचे सगळे नियम सांगून झाल्यानंतर सर्वात महत्त्वाचा नियम सांगितला आहे की 'शेषं महाराष्ट्रीवत' (बाकी सर्व नियम मराठी प्रमाणे असतील) यावरुन मराठी ही प्रमुख भाषा होती हे निर्विवाद आहे.

**संदर्भ ग्रंथ–**

१. मालशे सं. गं., इनामदार, सोमण (संपा), भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक, आ.१ली, पुणे, २००५
२. गोसावी र. रा., मराठीचे ऐतिहासिक भाषाशास्त्र, आ. १ ली, पुणे, २००४
३. पगार एकनाथ, मराठीचा उगमकाल व मराठीची जनकभाषा (शोधनिबंध) सटाणा महाविद्यालय, २८ फेब्रुवारी २००३
४. नरके हरी, अभिजात मराठी, लोकराज्य, फेब्रुवारी– २०१३ पृ. ८–१०
५. देशपांडे सु. र., शोध प्राचीनत्वाचा, लोकराज्य, फेब्रुवारी– २०१३ पृ. ११–१४